**Indian Academy of Pediatrics (IAP)**

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण ७१ :**

# कर्करोग असलेल्या मुलाची काळजी कशी घ्यायची?


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानीवडेकर

अनुवादक : डॉ. रेणू बोराळकर

पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोळकर

श्री. उज्ज्वल करमळकर

*Convener:* Arpita Bhattacharya

*Members:* BB Sahni, Manas Kalra, Purna A Kurkure

*Reviewer:* Pooja Dewan




नवनवीन संशोधनामुळे आणि चांगल्या गुणकारी औषधांमुळे अनेक लहान मुलांमधील कर्करोग आता बरे होतात, मात्र हे उपचार बरेच दिवस चालत असल्यामुळे मुलांची घरच्या घरी काळजी घेण्याची वेळ पालकांवर येते. अशा वेळेस काही गोष्टी पालकांना माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या चर्चेद्वारे आपण कर्करोग असलेल्या मुलांची काळजी कशी घ्यावी हे पाहू या.

## कॅन्सर असलेल्या मुलाची काळजी कशी घ्यावी या संबंधी वारंवार विचारले जाणारे दहा प्रश्न

प्र.१ माझ्या मुलाला कर्करोग का झाला? मी काही चूक केली आहे किंवा कोणती तरी महत्वाची काळजी माझ्याकडून चुकली आहे का ? ज्यामुळे त्याला कर्करोग झाला?

प्र.२ केमोथेरपी म्हणजे काय? केमोथेरपी म्हणजेच कर्करोगावरील औषधोपचार घेत असताना सर्व साधारणपणे शरीराच्या इतर भागांवर कोणते दुष्परिणाम (side effects) होतात?

प्र.३ माझ्या मुलाला कॅन्सर उपचारादरम्यान ताप आल्यास काय करावे?

प्र.४ मळमळ होत असल्यामुळे आणि भूक लागत नसल्यामुळे माझे मूल खात नाही, मला खूप काळजी वाटते, मी अशावेळी काय करु? माझ्या मुलाला कोणता आहार द्यावा हे सांगा.

प्र.५ केमोथेरपी दरम्यान मी माझ्या मुलाच्या वैयक्तिक स्वच्छतेची काळजी कशी घेऊ?

प्र.६ माझ्या मुलाला केमोथेरपीसाठी सेंट्रल लाईन आहे. (म्हणजे शिरेतून एक नळी हृदयाच्या जवळील मोठ्या रक्तवाहिनीमध्ये घालण्यात येते आणि तिच्यातून इंजेक्शन मार्फत औषधे शरीरात सोडण्यात येतात.) मी घरी त्या सेंट्रल लाईनची कशी काळजी घ्यावी ते सांगावे?

प्र.७ मी त्याचे कॅन्सरचे उपचार चालू असताना नियमित लसीकरण चालू ठेवावे का?

प्र.८ माझ्या किशोरवयीन मुलगा कर्करोगाचे निदान झाल्यापासून खूप मागे पडला आहे, मी त्याला कसे समजावून सांगावे आणि त्याचे समुपदेशन कसे करावे? या दरम्यान माझ्या मुलाचे मित्र कमी झाले आहेत आणि शाळादेखील बंद झाली, तो खूप बुजला आहे, याचा सामना करण्यास त्याला मी काय मदत करावी?

प्र.९ मी माझ्या मुलासोबत त्याच्या कॅन्सरविषयी काय बोलू आणि किती माहिती त्याला देवू हे सांगा.

प्र.१० कुटुंबातील इतर सदस्यांमध्ये कर्करोग पसरु शकतो का? माझी इतर मुले माझ्या या कॅन्सर झालेल्या मुलाबरोबर खेळू, झोपू, जेवू शकतात का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 20202021**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 20202021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** **Piyush Gupta, Bakul Parekh**
**IAP Co-ordinators:** **GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure**

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# कर्करोग असलेल्या मुलाची काळजी कशी घ्यायची?

## प्र. १

**माझ्या मुलाला कर्करोग का झाला? मी काही चूक केली आहे किंवा कोणती तरी महत्वाची काळजी माझ्याकडून चुकली आहे का ? ज्यामुळे त्याला कर्करोग झाला?**

उत्तर : कर्करोगामध्ये पेशीचे अनियंत्रित विभाजन होते. सामान्य मानवी शरीरात काही प्रणाली असतात, ज्या पेशींच्या विभाजनावर ताबा ठेवतात. जेव्हा ही प्रणाली काम करत नाही, तेव्हा पेशीचे विभाजन अनियंत्रितपणे होत राहते आणि यामुळे पेशींची अपरिमित वाढ होते. या पेशी कार्यक्षम नसतात. या कर्करोगाच्या पेशी असतात. या पेशींना त्याच्या मूळ ठिकाणापासून शरीरातील इतर ठिकाणी पसरण्याची सुद्धा प्रवृत्ती असते. या प्रसाराला **metastasis** किंवा रोगसंक्रमण असे म्हणतात.

जेव्हा मुलाला कर्करोग होतो, तेव्हा पालकांना खूप अपराधीपणाची भावना येते त्यांना असे वाटते की त्यांच्या मुलाची त्यांनी नीट काळजी घेतली नाही किंवा त्यांना काही खाद्यपदार्थ दिले किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या संपर्कात आणले किंवा काहींना असेही वाटते आईच्या गर्भधारणेशी संबंधित समस्यांमुळे त्यांच्या मुलाला कॅन्सर झाला. **हे बरोबर नाही.** अपराधी वाटून घेवू नका. तुमच्या मुलांमध्ये कॅन्सर होऊ नये म्हणून तुम्ही काहीही करु शकत नाही. काही वेळा मुलांना डाऊन सिंड्रोम किंवा फँकोनी ऍनिमिया यासारखे काही आजार जन्मत: असतात. कर्करोग करण्यास ते कारणीभूत असतात. परंतु हे दुर्मिळ आहे अणि बहुतेकांमध्ये कर्करोग किंवा त्याचा प्रसार होण्याचे कोणतेही कारण कधीही सापडत नाही. **म्हणून कृपया स्वत:ला दोष देऊ नका.**

## प्र. २

## केमोथेरपी म्हणजे काय? केमोथेरपी म्हणजेच कर्करोगावरील औषधोपचार घेत असताना सर्व साधारणपणे शरीराच्या इतर भागांवर कोणते दुष्परिणाम (side effects) होतात?

उत्तर : केमोथेरपी म्हणजे कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्यासाठी औषधे देऊन केला जाणारा उपचार.

ही औषधे वेगाने विभाजित होणाऱ्या कर्करोगाच्या पेशी नष्ट करतात. या औषधांमुळे अस्थिमज्जा (Bone marrow) आणि आतड्याचे अस्तर यासारख्या झपाट्याने विभाजित होणाऱ्या पेशी असलेल्या उतींचेही काही नुकसान होते. किमोथेरपीचे दुष्परिणाम शरीराच्या या दोन्ही भागांमध्ये दिसून येतात. सुदैवाने या भागातील दुष्परिणाम काही दिवसातच किंवा आठवड्यातच निघून जातात आणि त्यांचे नेहमीचे कार्य परत सुरू होते.

- केमोथेरपी आवर्ती (cyclical) पद्धतीने दिली जाते. यामध्ये विश्रांतीचा कालावधी असतो. हे तुमच्या मुलाच्या शरीराला आराम देऊन बरे करायला वेळ मिळावा म्हणून दिला असतो. या काळात नवीन निरोगी पेशी तयार करण्याची संधी मिळते.
- केमोथेरपी ही शिरेतल्या इंजेक्शनमधून (IV) स्नायूमध्ये इंजेक्शन (IM) देऊन, तोंडातून गोळ्या किंवा पातळ औषधे देऊन दिली जाते. काही केमोथेरपीची औषधे मेंदू आणि मज्जारज्जूभोवती असलेल्या द्रवामध्ये थेट इंजेक्शन म्हणून दिली जातात. या प्रकारे "लंबर पंक्चर" या कृतीद्वारेही इंजेक्शने दिली जातात.
- थकवा, मळमळ, उलट्या, तोंडात फोड येणे किंवा तोंड येणे, लाल रक्तपेशी कमी झाल्याने ॲनिमिया आणि संसर्गाचा वाढलेला धोका, हे सामान्यपणे आढळून येणारे दुष्परिणाम आहेत. हे दुष्परिणाम तुमच्या डॉक्टरांनी लिहून दिलेल्या योग्य औषधांनीच कमी होतात आणि १०० टक्के कमी केले जाऊ शकतात.
- दीर्घकालीन दुष्परिणाम (Longterm side effects) उपचाराच्या प्रकारावर अवलंबून असतात. विशेषत: मेंदूत कर्करोगाची गाठ (ब्रेन ट्युमर) असलेल्या मुलांना, रेडिओथेरपी घेत असलेल्या मुलांना संप्रेरकांचे असंतुलन होते किंवा शारिरीक वाढ खुंटते किंवा त्यांच्या बुद्धीमत्तेवर परिणाम होऊ शकतो. काही प्रकाराच्या किमोथेरपीचे दुष्परिणाम उशिरा आढळून येतात. उदा. हृदयाच्या स्नायूंना होणारे संभाव्य नुकसान किंवा हाडांचा आरोग्यावर होणारे दुष्परिणाम.

## प्र. ३

## माझ्या मुलाला कॅन्सर उपचारादरम्यान ताप आल्यास काय करावे?

उत्तर : उपचार घेत असलेल्या मुलांना जीवघेणा संसर्ग होऊ शकतो. बऱ्याचदा १०० फॅरनहाईटपेक्षा जास्त ताप आल्यास कृपया तुमच्या मुलाला तातडीने रुग्णालयाच्या आपत्कालीन कक्षात न्या. ताप कमी करण्यासाठी तुम्ही तापाचे औषध (पॅरासिटामॉल) देऊ शकता, परंतु तातडीने रुग्णालायामध्ये दाखल झाल्यास मुलाला लवकर उपचार मिळू शकतो. घरगुती उपचार करुन वेळ घालवण्यापेक्षा, तातडीने रुग्णालयामध्ये दाखल करण्यास उशीर होऊ देऊ नका.

तुमच्या मुलाचे तापाचे कारण काय आहे हे ठरवण्यासाठी विशेष चाचण्या आणि संसर्ग नियंत्रित करण्यासाठी प्रतिजैविके दिली जाऊ शकतात. तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हे तातडीने मिळाल्याने मुलाला लवकर बरे वाटू शकते.

## प्र.४

**मळमळ होत असल्यामुळे आणि भूक लागत नसल्यामुळे माझे मूल खात नाही, मला खूप काळजी वाटते, मी अशावेळी काय करु? माझ्या मुलाला कोणता आहार द्यावा हे सांगा.**

उत्तर : मळमळ हा किमोथेरपीसाठी वापरल्या जाणाऱ्या बहुतेक औषधांचा दुष्परिणाम आहे. मळमळ कमीत कमी ठेवण्यासाठी तुमचे डॉक्टर तुमच्या मुलाला केमोथेरपीच्या आधी, त्या दरम्यान आणि नंतर औषधे देतील. तथापि मळमळ पूर्णपणे टाळता येत नाही. पण कुरमुरे किंवा बिस्किटे यासारखे कोरडे पदार्थ मळमळ वाटल्यास देणे सोपे जाते.

कॅन्सरमुळे भूक कमी लागते आणि केमोथेरपी, शस्त्रक्रिया, रेडिओथेरपी या सर्वांमुळे भूक आणखीनच कमी होते. कृपया तुमच्या हॉस्पीटलमधील आहारतज्ञाला विचारा.

- ❖ कर्करोगावर उपचार घेत असलेल्या मुलांना घरीच शिजवलेले ताजे अन्न द्यावे. कृपया तुमच्या मुलाला काय खायला हवे ते प्रेमाने विचारा.
- ❖ शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थ उत्तम आहेत.
- ❖ अन्नामध्ये प्रथिने, कर्बयुक्त पदार्थ आणि चरबीयुक्त पदार्थ सुयोग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. भात आणि पोळी, सर्व प्रकारच्या डाळी, भाज्या, दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश करावा.
- ❖ तुमचे कुटुंब मांसाहारी असल्यास अंडी, मासे, चिकन हे चांगले पर्याय आहेत.
- ❖ सर्व प्रकारची फळे उत्तम. खाण्यापूर्वी फळे स्वच्छ धुतली आहेत याची खात्री करुनच घ्या.
- ❖ तेलकट, मसालेदार आणि तळलेले पदार्थ टाळा. कारण यामुळे पोटात अस्वस्थ वाटते असे पदार्थ पचायला कठीण असतात.
- ❖ थोडा थोडा आणि बरेच वेळा दिलेला आहार उपयुक्त ठरतो. (small frequent feets)
- ❖ तुमच्या मुलासाठी अन्न पदार्थ हे मनोरंजक/आकर्षक बनवायचा प्रयत्न करा आणि त्याची भूक वाढवण्यासाठी कल्पकता वापरुन पदार्थ तयार करा.
- ❖ तुमच्या मुलाच्या वयानुसार सुमारे दीड ते दोन लिटर पाणी पिण्याची गरज आहे.

तुमच्या डॉक्टरांनी किंवा आहारतज्ञांनी शिफारस केली असेल तरच विशिष्ट पदार्थ वापरा.

**महाग पदार्थ हे उत्तम असतात अशी समजूत चुकीची आहे.**

## प्र. ५

## केमोथेरपी दरम्यान मी माझ्या मुलाच्या वैयक्तिक स्वच्छतेची काळजी कशी घेऊ?

उत्तर : कर्करोगावरील उपचारादरम्यान स्वच्छता हा मुलाच्या काळजीचा एक अतिशय महत्वाचा भाग आहे.

- ❖ त्याला/तिला रोज आंघोळ घालावी. मांडीचा भाग पूर्णपणे स्वच्छ धुवावा.
- ❖ जर सेन्ट्रल लाईन (PICC) असेल तर ती पाण्याच्या संपर्कापासून सुरक्षित ठेवली पाहिजे.
- ❖ तोंडाची काळजी घेतली पाहिजे. दिवसातून दोनदा मऊ टूथब्रशने दात घासावे आणि प्रत्येक जेवणानंतर स्वच्छ पाण्याने गुळण्या कराव्या.
- ❖ तोंडात बुरशी येणे (oral thrush) हा आजार रोगप्रतिकारशक्ती कमी झालेल्या मुलांमध्ये सामान्यत: दिसतो, आणि असे झाल्यास डॉक्टरकडून औषधे लिहून घ्यावी व ती सल्ल्यानुसार वापरावी.
- ❖ कान स्वच्छ करणारे बोळे किंवा जीभ स्वच्छ करणाऱ्या उपकरणाचा वापर टाळावा.
- ❖ अनेकदा किमोथेरपीमुळे रक्तघटकांची संख्या कमी झाली असता, बुडाच्या भागाभोवती (perineal region) संक्रमण टाळण्यासाठी कोमट पाण्यामध्ये पोटॅशियम परमँगनेट किंवा बीटाडीन द्रव घालून त्यात मुलाला १५ मिनिटे बसवण्यास सांगतात. यास Sitz bath असे म्हणतात.

## प्र. ६

## माझ्या मुलाला केमोथेरपीसाठी सेंट्रल लाईन आहे. (म्हणजे शिरेतून एक नळी हृदयाच्या जवळील मोठ्या रक्तवाहिनीमध्ये घालण्यात येते आणि तिच्यातून इंजेक्शन मार्फत औषधे शरीरात सोडण्यात येतात.) मी घरी त्या सेंट्रल लाईनची कशी काळजी घ्यावी ते सांगावे?

उत्तर : मुलाला सेंट्रल वीनस लाईन (CVL) म्हणजे हातातील नीलेतून/अशुद्ध रक्तवाहिनीतून एक नलिका घालून ती हृदयाजवळील मोठ्या रक्तवाहिनीमध्ये सोडतात (PICC) किंवा Hikman line म्हणजे छातीवरुन नलिका घालण्यात येते. PICC लाईन सहसा वरच्या हातामध्ये आणि हिकमन लाईन छातीमध्ये लावतात CVL ही कर्करोग असलेल्या मुलांची जीवनरेखा आहे. सेंट्रल वीनस लाईन ही केमोथेरपी, विविध रक्तघटक आणि प्रतिजैविके देण्यासाठी तसेच चाचण्यांसाठी रक्त काढण्यास मदत करते. हे वारंवार सूया टोचण्याच्या वेदनांपासून संरक्षण करते. जे कधी कधी मुलांसाठी कर्करोगाच्या उपचारांसाठी अत्यंत आव्हानात्मक असू शकते.

सेंट्रल लाईनच्या भागाचे दर आठवड्याला ड्रेसिंग करणे आवश्यक आहे. अनेक सेंट्रल लाईन कार्यरत ठेवण्यासाठी त्यात सलाईन घालून त्या मोकळ्या कराव्या लागतात. बहुतेक रुग्णालयाच्या कर्करोगाच्या युनिटमध्ये प्रशिक्षित नर्सद्वारे सेंट्रल लाईन ड्रेसिंगची तरतूद असते. पालकांनाही त्याचे प्रशिक्षण नर्सद्वारे दिले जाऊ शकते. परंतु हे ड्रेसिंग करताना हातमोजे (gloves) घातल्यानंतर, सर्व भागाचे निर्जंतुकीकरण करुन सावधगिरीने केले पाहिजे. सेंट्रल लाईन पाण्यापासून दूर ठेवली पाहिजे आणि आंघोळीच्या वेळी ती झाकून, पाणी जाऊ नये याची काळजी घ्यावी.

सेंट्रल लाईन शरीरात घातलेल्या जागी किंवा आसपास कोणतीही वेदना किंवा लालसरपणा दिसला तर त्वरीत डॉक्टरांना सांगावे

## प्र.७

**मी त्याचे कॅन्सरचे उपचार चालू असताना नियमित लसीकरण चालू ठेवावे का?**

उत्तर : केमोथेरपीमुळे तुमच्या मुलाची रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. केमोथेरपी पूर्ण झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत सर्व नियमित लसीकरण पुढे ढकलले पाहिजे.

- गोवर, गालगुंड, रुबेला, बीसीजी, ओरल पोलिओ आणि कांजिण्या प्रतिबंधक यासारख्या जिवंतलसी, (live vaccines) किमोथेरपी चालू असताना देऊ नये, कारण यामुळे गंभीर संक्रमण होऊ शकते.

  त्रिगुणी (DTP) सारख्या लसीदेखील किमोथेरपी नंतर ६ महिन्यांनी द्याव्या. कारण लसीचा योग्य प्रतिसाद मिळण्यासाठी किमोथेरपी घेणाऱ्या बालकासाठी हे योग्य आहे.
- लसीकरण ज्या ठिकाणी थांबले होते, तेथूनच पुन्हा सुरु केले जाऊ शकते.
- ओरल पोलिओ live लस आहे म्हणून किमोथेरपी दरम्यान ती टाळली पाहिजे, त्याऐवजी पोलिओ लसीचे इंजेक्शन देता येते.
- वार्षिक इन्फ्ल्यूएंजा लस केमोथेरपी दरम्यान दिली जाऊ शकते.
- किमोथेरपी चालू असताना तुमच्या मुलाला दुखापत झाल्यास आणि त्याने प्राथमिक लसीकरण पूर्ण केले नसेल तर T. T. ची लस दिली जाऊ शकते.
- कर्करोगावर उपचार चालू असताना कुत्रा चावल्यास रेबीज इमुनोग्लोबुलीन आणि रेबीज प्रतिबंधक लस द्यावी.

घरातील सर्व लोकांनी आणि भावंडांनी कांजिण्या प्रतिबंधक लस आणि फ्लू लस शक्यतो घ्यावी

## प्र.८

**माझ्या किशोरवयीन मुलगा कर्करोगाचे निदान झाल्यापासून खूप मागे पडला आहे, मी त्याला कसे समजावून सांगावे आणि त्याचे समुपदेशन कसे करावे? या दरम्यान माझ्या मुलाचे मित्र कमी झाले आहेत आणि शाळादेखील बंद झाली, तो खूप बुजला आहे, याचा सामना करण्यास त्याला मी काय मदत करावी?**

उत्तर : कर्करोगाचे निदान कुटुंब आणि मुल दोघांसाठीही खूप क्लेशदायक असते. विशेषत: कर्करोग ह्या शब्दाचा अर्थ समजून घेण्याइतपत मुल मोठे असेल आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामांची त्याला जाणीव असेल. त्याच्यासाठी असलेले सर्व धोके, शारीरिक वेदना आणि शरीरातील बदल विशेषत: केस गळणे, सामान्य जीवन पूर्णपणे बदलून जाणे आणि मृत्यूच्या शक्यतेची भीती वाटणे या सर्व गोष्टींमुळे त्याच्यामध्ये प्रचंड उलथापालथ होते.

मुलाला अत्यंत चिंता वाटते आणि खूप भीती येते. भावनांचा कोंडमारा होतो आणि नैराश्य येऊ शकते. रुग्णालयातल्या भेटी, केमोथेरपी सायकल, कॅन्सरच्या उपचारातील गुंतागुंत आणि आर्थिक चिंता या वावटळीत पालकांकडून या समस्यांकडे दुर्लक्ष होऊ शकते. मुले देखील त्यांच्या पालकांच्या चिंता आणि दु:खाबद्दल खूप भावनिक असतात. काही वेळा मुले विशेषत: किशोरवयीन मुले आपल्या भावना व्यक्त करण्यास उत्सुक नसतात. पालकांनी आपल्या पाल्याशी सौम्य वागून, सहानुभूतीपूर्वक बोलून, धीराने वागून आपल्यासमोर त्याला मन मोकळे करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. गरज वाटल्यास समुपदेशकाची मदत घेतली पाहिजे.

जिथे भावना व्यक्त केल्या जाऊ शकतात अशा खुल्या कौटुंबिक चर्चा खूप उपयुक्त असतात. तुमच्या मुलाला फोनवर किंवा सोशल मिडीयावर मित्रांच्या संपर्कात राहण्यासाठी प्रोत्साहित करा. मुलाला गृहपाठ करुन शाळेला पाठवायला सांगावे. शाळेच्या मुख्यध्यापकांशी या विषयावर तपशीलवार चर्चा करा. बहुतेक शाळा खूप साहाय्य करतात आणि ऑनलाईन शिक्षणाने गोष्टी सोप्या होऊ शकतात. तुमचे डॉक्टर तुम्हाला आजारपणाचे मेडिकल सर्टिफिकेट देतील आणि किती दिवस घरी रहाणे आवश्यक आहे याचा निर्देश करतील. उपचारादरम्यान जीवन शक्य तितके सामान्य ठेवण्याचा प्रयत्न करावा. अनेक रुग्णालयांमध्ये सल्लागार आणि समुपदेशक असतात. ते आपल्याला मदत करु शकतात.

## प्र. ९

## मी माझ्या मुलासोबत त्याच्या कॅन्सरविषयी काय बोलू आणि किती माहिती त्याला देवू हे सांगा.

उत्तर : कृपया तुमच्या मुलासोबत मोकळ्या मनाने बोला. त्याच्याशी त्याचे निदान, उपचाराची योजना आणि अपेक्षित गुंतागुंतीच्या समस्यांबाबत बोला. कृपया काहीही लपविण्याचा प्रयत्न करु नका. कारण यामुळे तुमच्या मुलाचा तुमच्यावरील विश्वास कमी होऊ शकतो. शक्य तितक्या प्रामाणिकपणे सर्व प्रश्नांची उत्तरे देणाचा प्रयत्न करा. तुमचे डॉक्टर तुम्हाला यामध्ये मदत करु शकतात. मोठ्या मुलांसाठी असलेल्या कॅन्सरबद्दल बरीच ऑनलाईन माहिती उपलब्ध आहे आणि तुमचे रुग्णालय तुम्हाला पुस्तिका आणि परिपात्रिका देखील देऊ शकते. तुम्हाला तुमच्या मुलाला कॅन्सर आणि त्याच्या उपचाराबद्दल योग्य माहिती मिळत आहे याची नेहमी खात्री करुन घ्या. तुमचे डॉक्टर तुमच्यासाठी आणि मुलासाठी नक्कीच वेळ काढतील आणि सर्व प्रश्न सोडवतील.

## प्र. १०

## कुटुंबातील इतर सदस्यांमध्ये कर्करोग पसरु शकतो का? माझी इतर मुले माझ्या या कॅन्सर झालेल्या मुलाबरोबर खेळू, झोपू, जेवू शकतात का?

उत्तर : कर्करोग हा संसर्गजन्य नसतो. तो एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरत नाही. कॅन्सरवर उपचार घेत असलेल्या मुलासोबत भाऊ किंवा मित्र खेळू शकतात. झोपू शकतात किंवा खाऊ शकतात. तथापि इतर मुलांना कोणताही विषाणूजन्य आजार, जुलाब किंवा संसर्गजन्य आजार याचा त्रास तर नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे. आपल्या मुलाने मास्क लावला पाहिजे.

जर मुल कांजण्या किंवा गोवर ग्रस्त असलेल्या मुलाच्या संपर्कात आले, तर कृपया आपल्या डॉक्टरांना त्वरीत कळवा. कॅन्सरग्रस्त मुलांची प्रतिकारशक्ती कमी झालेली असते आणि असे संक्रमण धोकादायक ठरु शकते. संक्रमणाची तीव्रता देखील गंभीर असू शकते. म्हणून बाहेरची कामे गर्दी नसलेल्या ठिकाणी मर्यादित ठेवावीत. (शक्यतो मुलाला अशा ठिकाणी नेऊ नये. आणि नातेवाईक आणि मित्रांच्या भेटी, घरी येणे, कमीत कमी ठेवा, जेणे करुन मुलाला संसर्ग होणार नाही.